**‘ प्रणम्य शिरसा … … … अश्विनीकुमार ’**

श्री धन्वन्तरि हे आयुर्वेददेवता / आरोग्यदेवता म्हणून प्राय: सर्वपरिचित आहेत . पण अश्विनीकुमार मात्र तसे अनोळखी !

‘वैद्य’ हा शब्द वेदांमध्ये नाही . तिथे त्याऐवजी ‘भिषक्’ असा शब्द आहे . वैद्य शब्द प्रथमतः रामायणात येतो . तसा ‘धन्वन्तरि’सुध्दा वेदांमध्ये नाही, तेथे ‘देवांचे भिषक्’ म्हणून रूद्र, वरूण, इंद्र आणि सर्वाधिक प्रशस्ति ही ‘अश्विनीकुमारांची’ आहे . धन्वन्तरिंचा उल्लेख व त्यांचे विष्णुचे अंशावतारस्वरूप असणे हे वेदकाळानंतरचे म्हणजे पुराणग्रंथातील उल्लेख होत . वैदिक वाङमयात मात्र देवभिषक् म्हणून अश्विनीकुमारच आहेत .

अश्विनीकुमार हे दोघे जुळे भाऊ होत . त्यांची नावे दस्र व नासत्य आहेत . त्यांचा पिता साक्षात् सूर्य होय . तर त्यांची माता ही छाया किंवा सरण्यू होय .

अश्विनीकुमार हे मधुविद्या (transplantation), कश्यविद्या (plastic surgery) व प्रवर्ग्य / संजीवनी विद्या (पुनर्जन्म / मृतसंजीवन) यांत प्रवीण होते . त्या विद्या त्यांनी महर्षी दधीचि यांचेकडून शिकल्या . याच दधीचि ऋषिंनी स्वत:च्या अस्थि इंद्राला दान केल्या . त्यापासून वज्र बनले . त्याने वृत्रासुराचा वध केला . ( पुणे येथे सिंबियॉसिसच्या पुढे उतारावर शेतकी महामंडाकडे जाणा-या रस्त्याच्या चौकाला दधीचि ऋषि हे नाव आहे . )

अश्विनीकुमारांचे गुरू भास्कर ( सूर्य ) होत . अश्विनीकुमारांनी ‘चिकित्सासारतंत्र’ हा ग्रंथ रचला . त्यांनी अनेक चिकित्सा चमत्कार करून दाखवले .

खेल राजाची पत्नी विश्पला हिचा युध्दात पाय तुटल्यानंतर एका रात्रीत तिला नवीन धातुमय पाय बसवला .

भग ,ऋजाश्व व कण्व या अंधांना दृष्टी दिली . नृषद्पुत्रास श्रवणसामर्थ्य दिले . इंद्राचा भुजस्तंभ नष्ट केला . त्याचे वृषण अहिल्यापती गौतम ऋषिंच्या शापाने गळून गेल्यावर त्याला मेषाचे (बकरा) वृषण बसवले . पूष्णाचे दात नीट केले . नक्षत्रराज चंद्राचा राजयक्ष्मा नीट केला .

‘जराजर्जर अशा वृध्द च्यवन ऋषिला असे औषध दिले की तो स्त्रियांनाही मनमोहक वाटेल असा नवयौवनसंपन्न झाला . त्या औषधाचे नाव जगप्रसिध्द आहे . बरोब्बर ! ‘च्यवनप्राश’ . तर च्यवनप्राश हा च्यवनाने प्राशन केला म्हणून तसे नाव . पण त्याचे निर्माते अश्विनीकुमार होत .

मुळात आयुर्वेदाचे जे अवतरण भूलोकात झाले त्यामध्येही अश्विनीकुमार आहेत . ब्रह्मदेवाने आयुर्वेदाचे स्मरण केले व ते ज्ञान त्यांनी दक्ष प्रजापतीस (पार्वतीचा पिता) दिले . त्याने ते अश्विनीकुमारांस दिले . पुढे ते इंद्राने ग्रहण केले . इंद्राकडून ते अत्रि, वसिष्ठ, भृगु, धन्वंतरी इ . ऋषिंनी घेतले . ते ऋषि पृथ्वीवर आले व तिथून पुढे येथे आरोग्यशास्त्र म्हणजे आयुर्वेदाचे प्रस्थापन झाले . (पहा साम्य ः शिवलीलामृत, अकरावा अध्याय, ‘मग सांप्रदाये ऋषीपासोन | आला अध्याय हा थोर पावन’ )

योगायोग पहा, सूर्य ही आरोग्याची प्रकाशाची सत्त्वगुणाची तेजाची देवता आहे . ‘आरोग्यं भास्करात् इच्छेत्’ असे सुभाषित आहे . ‘अश्विनीकुमार’ हे देवांचे भिषक् होत . ‘शनि’ ही रोगाची तर ‘यम’ मृत्युची देवता होय . अभेद्यकवचकुंडलांचा ‘दानवीर कर्ण’ सर्वजण जाणतातच . अश्विनीकुमार, यम, शनि व कर्ण हे सर्व ‘सूर्यपुत्र’ होत . म्हणूनच आरोग्याचा तेज:प्रकाश मिळवायचा असेल तर सूर्याचीच आराधना करायला हवी . त्यासाठीच गायत्री (सावित्री) ला या देशात खूप प्रतिष्ठा आहे, तितकीच प्रतिष्ठा सूर्यनमस्कारालाही आहे .

………

श्रीधन्वन्तरि

भारतीय संस्कृतीमध्ये वैद्यकशास्त्राची देवता म्हणून श्रीधन्वन्तरि हे वंदनीय आहेत . वेदांमध्ये श्रीधन्वन्तारिंचा उल्लेख नाही . तेथे अश्विनीकुमार हेच वैद्यकशास्त्राची देवता होत . श्रीधन्वन्तरि हे पुराणग्रंथांनुसार श्रीविष्णुंचे अंशावतार होत . तसेच क्षीरसागराचे मंथनातून जी १४ रत्ने मिळाली त्यापैकी अमृतकलश घेऊन वरती येणारे श्रीधन्वन्तरिच होत .

पुढील श्लोकात श्रीधन्वन्तरिंचे वर्णन मनोवेधक शब्दांत केले आहे . हा श्लोक हेमाद्रिच्या चतुर्वर्गचिंतामणि या धर्मशास्त्रविषयक ग्रंथात आहे .

शंखं चक्रं जलौकां दधदमृतघटं चारूदोर्भिश्चतुर्भि ः /
सूक्ष्मस्वच्छाऽतिहृद्यांशुकपरिविलसन् मौलिमम्भोजनेत्रम् //
कालाम्भोदोज्ज्वलांगं कटितटविलसच्चारूपीताम्बराढ्यम् /
वन्दे धन्वन्तरिं तं निखिलगदवनप्रौढदावाग्निलीलम् //

अर्थ ः श्रीधन्वन्तरिंनी त्यांच्या चार सुंदर हातांत शंख, चक्र, जलौका व अमृतघट या वस्तू धारण केल्या आहेत . त्यांनी अतिशय तलम, स्वच्छ आणि आकर्षक असे उत्तरीय परिधान केले आहे . त्यांच्या शिरावर मुकुट आहे . त्यांचे डोळे कमळाप्रमाणे आहेत . त्यांची अंगकांती काळ्या ढगाप्रमाणे सावळी असली तरी तेजस्वी आहे . त्यांनी नेसलेला पीताम्बर शोभून दिसत आहे . एखादा वणवा जसा अरण्याचा नाश करतो तसा श्रीधन्वन्तरि लीलेने सर्व रोगांचे समूळ निवारण करतात .

या स्तवनात ‘आदर्श वैद्याचे रूप’ संकेतात्मकरीत्या चितारले आहे .

‘शंख’ हे संकटसमयी सहाय्य मागण्याचे चिन्ह होय . आजही ॲम्ब्युलन्सवर सायरन असतो . तसेच शंख हे समुद्रजन्य व प्राणिज औषधांचे प्रतीक होय . आयुर्वेदात प्रवाळ, मोती, कपर्दिक ही समुद्रजन्य व मृगशृंग, मध, दुग्ध, तूप, गोमूत्र ही प्राणिज औषधे वापरली जातात .

‘चक्र’ हे आयुर्वेदातील शस्त्रकर्माचे प्रतीक आहे . आधुनिक सर्जरीचे मूळ आयुर्वेदातच आहे . प्लॅस्टिक सर्जरी, फॅकोइमल्सिफिकेशन यांचे तंतोतंत वर्ण न ‘सुश्रुतसंहिता’ या ग्रंथात आढळते .

‘जलौका’ हे पंचकर्म चिकित्सेचे प्रतीक आहे . ‘पंचकर्म’ अर्थात् वमन, विरेचन, बस्ति, नस्य व रक्तमोक्षण हे ५ उपचार .

पंचकर्म ही रोगांना मुळापासून कायमचे नष्ट करणारी उपचारपद्धती होय .

‘अमृतघट’ म्हणजे साक्षात् सर्व आरोग्यदायी जीवनरक्षक औषधींचे सार होय .

श्रीधन्वन्तरिंची वेषभूषा वैद्याच्या ‘शुचि व पवित्रता’ या गुणांचे बोधक आहे . आणि त्यांचे डोळे हे वैद्याच्या आश्वासक प्रेमळ वृत्तीचे संकेत देतात .

©www.mhetreayurved.com9422016871

असे हे श्रीधन्वन्तरि आपणा सर्वांना आरोग्यसंपन्न जीवनाचे वरदान देवोत.

…………

**ः प्रणम्य शिरसा… … …श्रीहेमाद्रि ः**

'निबिड संस्कृताचे तोडोनि अरण्य ! प्रकटविले ज्ञानाचे हिरण्य ! ज्ञानेश्वर माऊलीचे कारूण्य ! धेनुचे पाडसावरी जणू!' सकलसंतशिरोमणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे अक्षय्यवाङ्मय म्हणजे महाराष्ट्राची भगवद्गीता 'ज्ञानेश्वरी'. मूलतः ज्ञानेश्वरी हा स्वतंत्र ग्रन्थ नसून उपजीवी रचना होय. श्रीमद्भगवद्गीतेवर सोप्या लोकभाषेतून सुबोध टीका म्हणजे 'भावार्थदीपिका' अर्थात् 'श्रीज्ञानेश्वरी'. येथे 'टीका' म्हणजे 'दोष काढणे' असा अर्थ नसून 'स्पष्टीकरण करणे' होय. अनेक संस्कृत ग्रन्थांवर संस्कृत भाषेतच 'टीका' उपलब्ध आहेत. अहो, एकतर संस्कृत समजत नाही मग पुनः मूळ संस्कृत ग्रन्थांवर संस्कृत भाषेतच 'टीका' लिहीण्याचा कायउपयोग? … मला सांगा ; English to English Oxford Dictionary आज Standard मानली जाते नं, तसंच तत्कालीन ज्ञानभाषा संस्कृत म्हणून संस्कृत to संस्कृत टीका !

अशीच एक अत्युत्तम टीका श्रीवाग्भटलिखित अष्टांगहृदय या आयुर्वेदातील सर्वाधिक लोकप्रिय संहितेवर 'श्रीहेमाद्रि' यांनी लिहीली. या टीकेचे नाव 'आयुर्वेद रसायन'. इतर टीकांप्रमाणे केवळ व्याकरणात्मक किंवा तुलनात्मक स्पष्टीकरणे न देता सर्वस्वी नवोन्मेषस्वरूप विचारप्रवर्तक तरीही व्यवहारोपयोगी अशी ही टीका. या टीकेचे मंगलाचरणसुद्धा अत्यंत मार्मिक आहे. बरं मग, आमचा काय संबंध श्रीहेमाद्रिशी? आहे म्हणून तर सांगतोय. श्रीहेमाद्रि हे देवगिरी येथील रामदेवरायचे अमात्य व कोषपाल म्हणजेच … हो … तेच हेमाडपंत ! ( श्रीसाईचरित्र लिहीणारे नव्हे ) हे आयुर्वेदाचे हेमाडपंत (श्रीहेमादि) १३व्या शतकात होऊन गेले. यांनीच हेमाडपंती मंदिरांची वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्यशैली निर्मिली. यांनीच 'धावती मराठी लिपी अर्थात् मोडी' प्रचारात आणली. यांनीच धर्मशास्त्राचा शिरोमणि ग्रन्थ 'चतुर्वर्गचिंतामणि' लिहीला (आपले कायदाशास्त्र). श्रीधन्वन्तरिंचे 'शंखं चक्रं जलौकां…' हे सुप्रसिद्ध स्तवन याच ग्रन्थातील. संक्षेपतः श्रीहेमाद्रि हे बहुपैलू सर्वस्पर्शी समाजधुरीण व्यक्तिमत्त्व होते. धर्म अर्थ काम मोक्ष या ४ही पुरूषार्थाचा 'सिद्धयोगी' होता. 'योगः कर्मसु कौशलम्' या श्रीकृष्णकृत् योगव्याख्येचा तो 'साधक' होता. श्रीहेमाद्रि हे महाराष्ट्राचं व मराठी सारस्वताचं शिरोभूषण होय… … … …पण आम्ही हेमाडपंती मंदिरांच्या पवित्र भिंतींवर आमची प्रेमलफडी व गाड्यांचे नंबर लिहीतो. मोडी आम्ही केव्हाच विसरलो. धर्मशास्त्र आम्ही रद्दीत विकले. संस्कृत आमच्या बुद्धिला जराही झेपत नाही. देवगिरीचा किल्ला खंडहर झालाय… … … आमची भूषणं आम्ही जपत नाही… … इंग्रजांकडून आम्ही ते शिकत नाही. कधी जागी होईल आमची षंढ मुर्दाड पिणारी फुंकणारी थुंकणारी व्यसनी तरूण पिढी ? … … आपले पूर्वज खरोखर 'बाप' होते.

'हेमाद्रि' या शब्दाचा अर्थ सांगणार? हेमाडपंत हा अपभ्रंश होय. हेम = सोने. अद्रि = पर्वत. सोन्यासारखं तेजस्वी अन् पर्वतासारखं उत्तुंग व्यकितमत्त्व!!

किती जणांना स्वतःच्या तरी नावाचा अर्थ माहीत असतो?

'सचिन' हा असाच अपभ्रंश होय. स्वतःच्या आणि सचिन या नावाचा 'अक्षरशः' अर्थ अचूक लिहून पाठवा… … आकर्षक पारितोषिक जिंका.

…………………

श्री वाग्भटाचार्य

आधुनिक वैद्यकाचा जनक ? हिप्पोकेटिस ! होमिओपॅथीचा ? हनिमान!……… आयुर्वेदाचा? काय माहित बुवा !?………आयुर्वेदाबद्दल, किंबहुना सर्वच भारतीय शास्त्रे व कला याबाबत 'पराकोटीची अनास्था' हे भारतीय माणसाचे वैशिष्ट्य होय. असो.

आयुर्वेद शास्त्र हे वेदातूनच विकसित झाले आहे. या शास्त्राचे मूलभूत शास्त्रीय ग्रंथ तसे अनेक होत. पण त्यातही 'बृहत्त्रयी' महत्त्वाची. बृहत् म्हणजे मोठे. त्रयी म्हणजे तीन. तीन कोण? तर श्रीचरक, श्रीसुश्रुत, श्रीवाग्भट. पैकी पहिल्या दोघांचे ग्रन्थ त्यांच्याच नावाने अर्थात् 'श्रीचरकसंहिता' व 'श्रीसुश्रुतसंहिता' असे प्रसिद्ध आहेत. श्रीवाग्भटांनी दोन ग्रन्थ लिहीले ः 'अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदय'. पैकी 'अष्टांगहृदय' हा पूर्णतः पद्यमय होय. तो अष्टांगसंग्रह या ग्रन्थाचे सारसंक्षिप्तरूप होय. त्या काळी मुद्रणकला नसलेने कमीतकमी अक्षरांत अधिकात अधिक ज्ञान सहजतेने सामावून ते मुखोद्गत (तोंडपाठ) करणे आवश्यक होते. म्हणूनच वैद्यकासारखे शास्त्रीय ज्ञानसुद्धा सुगम पद्यात गुंफले आहे. "मदन मधुक लम्बा निम्ब बिम्बी विशाला" ही 'वमन' देण्याची कडू तुरट औषधे होत पण तीही 'मालिनी'सारख्या नादमधुर लयबद्ध वृत्तात रचलीत!……… 'वाग्भट' याचा अर्थच 'वाचि भटः' ! ! अर्थात् 'भाषाप्रभू' होय. अष्टांगहृदय हा ग्रन्थ वाचताना हे वाग्भटवैशिष्ट्य शब्दोशब्दी पानोपानी प्रकटते.

श्रीवाग्भट हे सिंध प्रांती जन्माला आले. पण त्यांची सर्वाधिक लोकप्रियता केरळमध्ये आहे. थोडक्यात ते संपूर्ण भारतभर ख्यातकीर्त होते. एक आख्यायिका अशीही सांगतात की श्रीधन्वन्तरि श्रीवाग्भटांची परीक्षा पाहण्यास पोपट (शुक) रूप घेऊन श्रीवाग्भटांच्या अंगणातील वृक्षशाखेवर बसून "कोऽरूक् ?कोऽरूक् ?कोऽरूक् ?"असे विचारत होते. कोऽरूक् = कः अरूक् = कोण अरोगी ? आरोग्यसंपन्न कोण असतो? त्यावर श्रीवाग्भट उत्तरले "हितभुक् मितभुक् अशाकभुक्" अर्थात् जो हितकारक आहार योग्य मात्रेत घेतो व जो पालेभाज्या खात नाही तो आरोग्यसंपन्न ! हे काय भयंकर अशास्त्रीय?? याचे स्पष्टीकरण पुढे कधीतरी

श्रीवाग्भट हे गुप्तकाळात म्हणजे भारताच्या सुवर्णकाळात (इ.स.६वे शतक) होऊन गेले. याच काळात वराहमिहिर कालीदास इ. दिग्गज झाले. कालीदासाबाबत "पुरा कवीनां……… अनामिका सार्थवती बभूव" असे म्हणतात. आम्ही आयुर्वेदीय श्रीवाग्भटभक्तही "अत्रि कृतयुगे वैद्यो द्वापारे सुश्रुतःस्मृतः / कलौ वाग्भटनामा च गरिमाऽत्र प्रदिश्यते //" असे गातो. आणि कालीदासाच्या शाकुंतलाबद्दल "काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला" इ. म्हणतात. त्याच चालीवर श्रीवाग्भटांच्या अष्टांगहृदयाबाबत " शास्त्रेषु हृदयं श्रेष्ठं तत्र सारं सूत्रस्थानम् / तत्रापि प्रथमोऽर्धश्च तत्राऽध्यायचतुष्टयम् //" असे गाता येते.

अशा या श्रेष्ठ भारतीय शास्त्रकर्त्या श्रीवाग्भटांना शिरसा साष्टांग नमस्कार.

"चरकःस्याद् अतिश्रेष्ठः सुश्रुतोऽपि तथैव च / श्रीवाग्भटोऽपि सुश्रेष्ठः श्रेष्ठेभ्यः शतशो नमः //"

© www.mhetreayurved.com, 9422016871